Template 1-concept map

- **पाठाचे नाव**: गोष्ट गोधाराजाची. लेखक: दत्ता गणपत भगत (जन्म १९४५)
- **साहित्य प्रकार**-नाट्यांश
- **प्रमुख पात्रे**: गोधराज हरीण, काशिराजा ब्रह्मगुप्त महाराज, अमिता, कसाई,पिलू.
- **नाटकातील प्रमुख विचार**–भूतदया, अहिंसा, करुणा व पशुपक्ष्यांवर प्रेम
- **नाटक साहित्य व कलाप्रकाराचे विशेष.**
- **सराव**

Template 2

**प्रस्तावना**

गोष्ट गोधराजाची हा नाट्यांश जातक कथेतील एका कथेवर आधारित, नाटकाचा छोटा अंश आहे. नाटक ज्या मूळ कथेवर आधारित आहे त्या मूळ कथेचे नाव आहे 'उदारधी मृग'1,2

भगवान बुद्धाच्या कथा आपण कधीनाकधी ऐकल्या असतील. ह्या कथा म्हणजे त्यांनी केलेले उपदेश आहेत. अशाच एका उपदेशकथेवर 'गोष्ट गोधराजाची' हे नाटक आधरलेले आहे.

**पाठाचा आशय**

गोधराज हा हरणांचा राजा. त्याच्या सौंदर्याने मोहित होऊन राजा त्याला अभय देतो. परंतु त्याच्या कळपातील एक हरण राजासाठी आपणहून बळी जाईल असे ठरते. ह्या नियमाने एक दिवस 'अमिता' ह्या गरोदर हरिणीची पाळी येते व त्यामुळे पेच निर्माण होतो. एका दिवशी एकच जीव घ्यायचा ठरलेले असताना गरोदर हरिणीला मारून दोन जीवांची हत्या होणार! आपल्यासोबत आपले बाळ मरू नये म्हणून तात्पुरती दुसऱ्या हरणाची सोय करावी ह्यासाठी अमिता गोधराजाकडे येते. गोधराज ती जबाबदारी स्वत:वर घेतो व अमिताला तिच्या फेरीतून मुक्त करतो. परंतु राजाची आज्ञा गोधराजाला न मारण्याची असल्याने कसायासमोर संकट उभे राहते. राजासमोर गोधराज सर्व परिस्थितीचे वर्णन करतो. त्याचवेळी गोधराजाच्या कळपातील इतर हरणं बळी जाण्यास तयार होतात. सर्वांचे एकमेकांवरील प्रेम पाहून राजा थक्क होतो व कोणत्याच हरणाला आपण मारणार नाही असे वचन देतो. परंतु गोधराज हा नि:स्वार्थी,उदार मनाचा व प्रेमळ असल्याने इतर चतुष्पाद प्राणी, जलचर प्राणी व पक्ष्यांनाही अभय मिळवून देतो. शिवाय मांसाहारी राजाला मांसाहार करण्यापासून परावृत्त करतो.

**पाठातील विचार**

विद्यार्थ्यांनो, प्राणिमात्रांच्या जीवाचे रक्षण करून सर्वांना जगण्याचा अधिकार मिळवून देणारा गोधराज भूतदयेचा अर्थ आपल्याला सांगतो आहे. हा गोधराज म्हणजे तथागत गौतम बुद्धाचा अनुयायी अर्थात शिष्य आहे. ह्या नाट्यांशात अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे. तसेच जीवाचे महत्त्व, दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव व दु:खी जीवांबद्दल असलेली कणव असे इतर महत्त्वाचे पैलूही आपल्यासमोर येतात. भूतदया, त्याग ह्या मूल्यांची श्रेष्ठता गोधराज त्याच्या आचरणातून पटवून देतो.

हिंसेतून होणारी वेदना जो पर्यंत आपण अनुभवत नाही तोपर्यंत आपल्याला त्यातील दु:ख कळू शकत नाही. गोधराजाच्या कृतीतून ते आपल्याला समजते. अमिताचे मरण गोधराज स्वत:वर घेतो आणि एवढेच नाही तर राजाचे डोळेही उघडतो. अशाप्रकारे गौतमबुद्धाच्या करुणा,अहिंसा व भूतदया ह्या विचारांचे महत्त्व गोधाराजाच्या रूपाने आपल्याला समजते.

**नाटकातील प्रमुख पात्रे व त्यांचे स्वभावविशेष**

**गोधराज -** गोधराज हा बुद्धाचा शिष्य असल्यामुळे बुद्धाच्या शिकवणीचा तो प्रसार करतो. गोधराज अतिशय नम्र आहे. राजा त्याला चांगल्या अर्थाने चतुर आणि कुशल म्हणतो. राजाला केलेल्या एकाही मागणीत, स्वत:साठी तो एकही गोष्ट मागत नाही. परंतु चराचरातील सर्व प्राणी-जीव आपलेच आहेत ही एकत्वाची भावना त्याच्या अंगी बुद्धाच्या शिकवणीमुळे रुजलेली आहे. त्यामुळे दुसऱ्या प्राण्यासाठी केलेली प्रत्येक मागणी स्वत:साठीच आहे असे गोधराज समजतो. त्याच्या ह्या विनम्र आणि उदार स्वभावानेच राजा सर्व प्राणी-पक्ष्यांना मुक्त करण्यास तयार होतो. गोधराजाच्या रूपाने एका प्रकारे आपल्याला बुद्धाच्या विचारांचे दर्शन होते.

**महाराज-**ह्या नाट्यांशांतील राजा हे पात्रही महत्त्वाचे आहे. एकमेकांसाठी जीव देण्याची तयारी बघून राजाचे मन द्रवते. गोधाराजाचा विनम्रपणा आणि उदारता बघून राजा सर्व पशुपक्ष्यांना अभय द्यायचं कबूल करतो. त्याची अंमलबजावणी करताना आपल्याला त्रास होणार आहे हेही महाराज जाणून आहेत. कारण त्यांना मांसाहार व पशुपक्ष्यांची शिकार करणे सोडावे लागणार आहे. तरीही आपल्या आनंदासाठी दुसऱ्याचा जीव घेणे योग्य नाही ह्याची जाणीव महाराजांना होते. त्यामुळे मतपरिवर्तन झालेल्या राजाचे महत्त्वही पाठाच्या दृष्टीने मोठे आहे.

**थोडे नाटक ह्या साहित्य व कलाप्रकाराविषयी**

तुमच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनात तुम्ही नाटक बघितले असेल, त्यात कामही केले असेल. त्यामुळे नाटक हा प्रकार तुम्हाला परिचयाचा असेल. तरी एक साहित्य व कलाप्रकार म्हणून विचार करताना आपल्याला त्याच्या महत्त्वाच्या पैलूंकडे लक्ष द्यायचे आहे.

कथा, कादंबरी किंवा कोणतेही वर्णनात्मक साहित्य हे पसरट असते म्हणजे एखाद्या विषयाचे,घटनेचे वर्णन किंवा कथेतील पत्राला काय वाटते, घटना कुठे घडली कशी घडली ह्या सर्वचा तपशील कथा किंवा तशा

साहित्यप्रकारात येतो. नाटकात तपशीलांचे असे वर्णन येत नाही. तरीही नाटकाचा आशय, त्यातील व्यक्तिरेखा (पात्र), त्यांच्या मनातील भावभावना , स्थळ , काळ सर्व आपल्याला कळते. कशातून? तर संवादातून. नाटक हे प्रामुख्याने संवादावर आधारलेले असते. दोन पात्रांमधील संवाद एकानंतर एक अशा प्रकारे लिहिले जातात. नाटककार नाटकातील कथा, प्रसंग, काय घडले आहे ते व काय घडणार आहे ते, प्रसंग कुठे चालू आहे, दिवस आहे की रात्र आहे हे सर्व संवादातूनच सांगतो. तसेच पात्रांचे स्वभाव, त्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध, कथेतील संघर्ष सारे या संवादातून आपल्या समोर येते.

गोधराजाची गोष्ट वाचताना धड्याच्या सुरुवातीला कंसात काही वाक्ये लिहिलेली तुम्हाला दिसली का? अशीच काही कंसात लिहिलेली वाक्ये पाठाच्या मधेमधे येतात. ही कोणाच्याच तोंडी नाहीत. अशी वाक्ये म्हणजे नाटककाराने दिलेल्या सूचना असतात. कोणाला? नाटक बसवणाऱ्या दिग्दर्शकाला व ते नाटक करणाऱ्या नट आणि नट्यांना. म्हणजेच नाटक हे केवळ वाचून बाजूला ठेवण्यासाठी नाही तर, ते प्रामुख्याने रंगमंचावर म्हणजे स्टेजवर सादर करण्यासाठी असते हे तुमच्या लक्षात आले असेल.

नाटकाला रंगमंच, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा, प्रकाशयोजना, ध्वनी इ. रंगमंचाला पूरक असे पैलू असतात. कारण नाटक ही सादर करण्याची कला आहे. नाटक बसवणाऱ्या व्यक्तीला दिग्दर्शक म्हणतात तर ते सादर करणाऱ्या व्यक्तींना नट किंवा अभिनेता किंवा कलाकार म्हणतात. तुमच्या पाठ्यपुस्तकात दिलेला नाट्यांश ह्या सूचनांसह तुमच्या शाळेच्या स्नेहसंमेलनात करून पहा आणि नाटक अनुभवा!

**समारोप**

इथपर्यंतच्या स्लाइड्स तुम्ही वाचल्या असतील तर आता मूळ पाठ पुन्हा वाचा. तुम्हाला गोधराजाची गोष्ट कशी वाटली ते लिहून काढा व पुढील स्वाध्यायाकडे वळा.

**<u>उजळणी प्रश्न</u>**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१) अमिताची हत्या का करता येणार नव्हती?
२) हरणांना मुक्त करूनही गोधराज समाधानी का नव्हता?

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१) गोधाराजाने महाराजांना कोणती शिकवण दिली व कशाप्रकारे दिली?
२) गोधराज हा विचारी प्राणी आहे हे कशा कशातून सिद्ध होते?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१) 'आजपासून सर्व चतुष्पादांना मी मुक्त केले.'

२) ‘त्रास पुढे असतो, अंमलबजावणी करताना’

**<u>मुक्त प्रश्न</u>**

१) कल्पनाविस्तार
‘ जगात पशुपक्षी नसतील तर...!’ अशी कल्पना करा व त्यावर निबंध लिहा.

२) पुढील दोन उतारे वाचा. दुसऱ्या उताऱ्यात पहिल्या उताऱ्याच्या तुलनेत काही बदल झाले आहेत. त्यातील तुम्हाला जाणवलेले बदल शोधा.

| **उतारा १** | **उतारा २** |
|---|---|
| दरबार भरला होता. दरबारात महाराज,कसाई,पिलू, हरणांचा कळप,प्रधानजी आणि गोधराज असे सगळेच जमले होते. महाराजांनी प्रधानजींना विचारले ‘ का? का बरं उशीर होतोय?’ प्रधानजी उत्तरले, ‘कासयाची अडचण झालीय’. महाराजांनी कसायाकडे प्रश्नार्थक नजरेने बघितले आणि म्हटले ‘ काय अडचण आहे?’ कसाई मान खाली घालून उत्तरला ‘ज्याला आपण अभय दिले तोच गोधराज मरण्यासाठी पुढे आला.’ महाराजांनी आश्चर्यचकित होऊन विचारले ‘असं? का पण?” | **॥ अंधार ॥**<br>(*पुन: प्रकाश येतो, तेव्हा दरबार भरलेला. दरबारात कसाई, पिलू, हरणांचा कळप, प्रधानजी, गोधराज असे सगळेच जमलेले)*<br>**महाराज**: का? का उशीर होतोय?<br>**प्रधान**: कासयाची अडचण झालीय.<br>**महाराज**: हं, बोल.<br>**कसाई**: ज्याला आपण अभय दिले तोच गोधराज मरण्यासाठी पुढे आला.<br>**महाराज**: असं? का पण? |